# प्रकरण – सहावे

## निष्कर्ष व शिफारशी

# प्रकरण - सहावे

## निष्कर्ष व शिफारशी

6.1 प्रस्तावना.

6.2 निष्कर्ष.

6.3 शिफारशी.

6.4 सर्वसाधारण शिफारशी .

6.5 पुढील संशोधनासाठी सुचविलेले विषय.

# प्रकरण - सहावे

## निष्कर्ष व शिफारशी

### 6.1 प्रस्तावना:

प्रस्तुत शोध निबंधात कनिष्ठ माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनातील कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने अभ्यास केला आहे. यामध्ये प्रायोगिक व पारंपारिक पध्दतीने अध्यापन करण्यासाठी प्रकरण चारमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रथम अध्यापन साहित्याची निर्मिती केली होती. त्यानुसार दोन्ही गटांवर अनुक्रमे प्रायोगिक गटावर कथाकथन पध्दतीने व नियंत्रित गटावर पारंपारिक पध्दतीने अध्यापन केले. प्रस्तुत अभ्यासात दोन्ही अध्यापन पध्दतींच्या परिणामकतेची तुलना संपादनाच्या संदर्भात करावयाची होती. म्हणून अंतिम चाचण्यांच्या सरासरी गुणांतील फरकाची लक्षणियता ठरविण्यास t. परिक्षिका वापरली तसेच शिक्षक निरीक्षण आणि विद्यार्थी प्रतिक्रिया प्रश्नावली याही मूल्यमापन साधनांचा वापर केलेला आहे. या तीन मूल्यमापन साधनांद्वारे प्राप्त झालेल्या सामग्रीचे वर्गीकरण, विश्लेषण केले असून अन्वयार्थ लावलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात त्यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी सादर केलेल्या आहेत. तसेच पुढील संशोधनासाठी कांही विषय सुचविण्यात आलेले आहेत.

### 6.2 निष्कर्ष:

1) पाचव्या प्रकरणातील सारणी क्र. 5.1 (प्रायोगिक व नियंत्रित गटातील संपादित गुणांची वारंवारिता - चाचणी क्र. 1)

सारणी क्र. 5.2 (प्रायोगिक व नियंत्रित गटातील संपादित गुणांची वारंवारिता - चाचणी क्र. 2), सारणी क्र. 5.3 (प्रायोगिक व नियंत्रित गटातील संपादित गुणांची वारंवारिता - चाचणी क्र. 3) आणि सारणी क्र. 5.4 (प्रायोगिक व नियंत्रित गटातील संपादित गुणांची वारंवारिता - तिन्ही चाचण्यांच्या एकत्रित वारंवारिता वरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीच्या तंत्रांचा अवलंब करुन अध्यापन केल्यामुळे प्रायोगिक गटातील

विद्यार्थ्यांच्या गुण संपादनामध्ये वाढ झाली. प्रायोगिक गटातील जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांपेक्षा जास्त आहे.

2) सारणी क्र. 5.5 (प्रायोगिक व नियंत्रित गटातील संपादित गुणांची सरासरी चाचणी क्र. 1), सारणी क्र. 5.6 (प्रायोगिक व नियंत्रित गटातील संपादित गुणांची सरासरी चाचणी क्र. 2), सारणी क्र. 5.7 (प्रायोगिक व नियंत्रित गटातील संपादित गुणांची सरासरी चाचणी क्र. 3) आणि सारणी क्र. 5.8 (प्रायोगिक व नियंत्रित गटातील संपादित गुणांची सरासरी (तीन चाचण्यांची एकत्रित सरासरी) वरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीच्या तंत्रांचा अवलंब करुन अध्यापन केल्यामुळे प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या गुणांची सरासरी नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या सरासरी गुणांपेक्षा जास्त आहे. सारणी क्र. **5.5, 5.6**, व **5.7** वरुन असाही निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीच्या सरावाने विद्यार्थ्यांच्या संपादन गुणांमध्ये वाढ व प्रगती होत गेली.

3) सारणी क्र. **5.9** (चाचणी क्र. 1 ची लक्षणियता)
सारणी क्र. **5.10** (चाचणी क्र. 2 ची लक्षणियता)
सारणी क्र. **5.11** (चाचणी क्र. 3 ची लक्षणियता)
सारणी क्र. **5.12** (तीन चाचण्यांची संयुक्त लक्षणियता)

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, चाचणी क्र. 1 चे प्राप्त t मूल्य 2.73 हे .05 च्या सार्थकता स्तरावरील 2.06 या नमुना t मूल्यापेक्षा जास्त आहे. चाचणी क्र. 2 चे प्राप्त t मूल्य 5.73 हे .01 व .05 या सार्थकता स्तरावरील 2.80 व 2.06 ह्या नमुना t मूल्यापेक्षा जास्त आहे.

चाचणी क्र. 3 चे प्राप्त t मूल्य 6.11 हे .01 व .05 या सार्थकता स्तरावरील 2.80 व 2.06 ह्या नमुना t मूल्यापेक्षा जास्त आहे.

त्याचप्रमाणे तिन्ही चाचण्यांचे संयुक्त t मूल्य 5.02 हे .01 व .05 या सार्थकता स्तरावरील नमुना t मूल्यापेक्षा निश्चितच जास्त आहे. हा दिसून येणारा लक्षणीय फरक

न्यादर्शन चढउतारामुळे पडलेला नसून तो वास्तविक फरक आहे. तो फरक कथाकथन पध्दतीच्या परिणामामुळेच पडलेला आहे.

4) सारणी क्र. 5.13 (कथेची भाषा योग्य व प्रभावी होती.) सारणी क्र. 5.14 (कथेतील घटनांचा क्रम योग्य होता.) सारणी क्र. 5.15 (कथानिवेदिका आपल्या कथाकथनाशी व विद्यार्थ्यांशी एकरुप झाली होती.) मध्ये दिलेल्या शिक्षकांच्या प्रतिसादावरुन असे दिसून येते की कथानिवेदिकेने कथेमध्ये योग्य व प्रभावी भाषा वापरली होती कारण पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन सर्वात अधिक (333) आहे. तसेच कथेमध्ये घटनांचा क्रम योग्य होता कारण या निकषाचे बाबतीत पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन सर्वात जास्त (243) आहे आणि कथानिवेदिका आपल्या कथाकथनाशी व विद्यार्थ्यांशी एकरुप झाली होती कारण या निकषाचे बाबतीत पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन (270) हे सर्वात अधिक असल्याचे दिसते यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दती परिणामकारक होण्यासाठी हे तीन निकष अत्यंत उपयुत आहेत.

5) सारणी क्र. 5.16 (कथानिवेदिकेने आवाजातील चढउताराकडे कटाक्षाने लक्ष पुरविले होते.) सारणी क्र. 5.14 (कथानिवेदिकेचा शारीरिक अभिनय व मुद्राभिनय परिणामकारक होता.) मध्ये मिळालेल्या शिक्षकांच्या प्रतिसादावरुन असे दिसून येते की कथानिवेदिकेने आवाजातील चढउताराकडे कटाक्षाने लक्ष पुरविले होते कारण या निकषाला मिळालेल्या पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन (273) हे सर्वात जास्त आहे. तसेच कथानिवेदिकेचा शारीरिक अभिनय व मुद्राभिनय हा परिणामकारक होता कारण या निकषाला मिळालेल्या पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन (255) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दती परिणामकारक होण्यासाठी आवाजातील चढउतार, शारीरिक अभिनय व मुद्राभिनय हे योग्य प्रमाणात उपयुक्त ठरले.

6) सारणी क्र. 5.17 (कथानिवेदिकेने बहुश्रुतपणाचा वापर करुन कथा भरदार, डौलदार बनविण्याचा प्रयत्न केला होता.) सारणी क्र. 5.18 (कथानिवेदिकेने वेळेचे भान

ठेवले होते.) व सारणी क्र. **5.19** (कथानिवेदिकेने चित्रमयतेचा वापर करुन कथा खुलविण्याचा प्रयत्न केला होता.) मध्ये शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादावरुन असे दिसून येते की, कथानिवेदिकेने बहुश्रुतपणाचा कमी प्रमाणात वापर केलेला होता कारण या निकषाचे बाबतीत अजिबात नाही या पर्यायाचे गुणांकन (83) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . तसेच कथानिवेदिकेने वेळेचे भान कांही प्रमाणात ठेवले होते कारण या निकषाला मिळालेल्या अंशतः या पर्यायाचे गुणांकन (88) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . त्याचप्रमाणे कथानिवेदिकेने चित्रमयतेचा वापर कमी प्रमाणात केला होता कारण या निकषाचे बाबतीत अंशतः या पर्यायाचे गुणांकन (80) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीच्या अध्यापनात वरील तीन तंत्रांचा पुरेशा प्रमाणात वापर होऊ शकला नाही. याचा वापर पुरेशा प्रमाणात झाल्यास अध्यापन अधिक प्रभावी,परिणामकारक होईल.

7) सारणी क्र. **5.20** (कथेतील पात्रांची भाषा त्याची त्याची स्वभाववैशिष्ट्ये प्रकट करणारी होती.) सारणी क्र. 5.21(कथानिवेदिकेने विद्यार्थी सहभाग घेतला होता.) मध्ये मिळालेल्या शिक्षकांच्या प्रतिसादावरुन असे दिसून येते की, कथेतील पात्रांची भाषा त्याची त्याची स्वभाववैशिष्ट्ये प्रकट करणारी होती कारण या निकषाचे बाबतीत मिळालेल्या पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन (150) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . तसेच कथानिवेदिकेने विद्यार्थी सहभाग घेतला होता कारण या निकषाचे बाबतीत मिळालेल्या पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन (192) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . यावरुन असा निष्कर्ष निघतो की, सारणी क्र. **5.21** व सारणी क्र. **5.22** चे निकष कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्यास उपयुक्त ठरतील.

8) सारणी क्र. **5.23** (कथाकथन पध्दतीच्या अध्ययनात विद्यार्थी एकरुप व तन्मय झाले होते.) सारणी क्र. **5.24** (कथाकथन पध्दतीच्या अध्ययनात विद्यार्थी उत्साही दिसत होते.) सारणी क्र. **5.25** (तोंडी मूल्यमापनात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला मिळाला.) मध्ये

मिळालेल्या शिक्षकांच्या निरीक्षणावरुन असे दिसून येते की, अध्ययनात विद्यार्थी एकरुप व तन्मय झाले होते कारण या निकषाला मिळालेल्या पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन (225) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे तसेच अध्ययनात विद्यार्थी उत्साही दिसत होते कारण या निकषाचे बाबतीत पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन (249) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे आणि तोंडी मूल्यमापनात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला मिळाला कारण या निकषाला मिळालेल्या पूर्णपणे या पर्यायाचे गुणांकन (255) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीच्या परिणामकारक अध्यापनामुळेच विद्यार्थी तन्मय व एकाग्र झाले होते. तसेच ते अध्ययनात उत्साही दिसत होते व तोंडी मूल्यमापनात त्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

9) सारणी क्र. **5.26** (कथास्वरुपात सांगितलेली ऐतिहासिक माहिती नेहमीच्या पध्दतीपेक्षा चांगल्या प्रकारे आकलन झाली.) या विधानासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी (25 पैकी 23) पूर्णपणे हा पर्याय सुचविल्यामुळे या पर्यायाचे एकूण गुणांकन (69) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथास्वरुपात सांगितलेली ऐतिहासिक माहिती विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे आकलन झाली.

10) सारणी क्र. **5.27** (कथेच्या स्वरुपात ऐतिहासिक माहिती समजून घेत असतांना उत्सुकता वाढत होती.) या विधानासाठी एकूण विद्यार्थ्यांपैकी 18 विद्यार्थ्यांनी पूर्णपणे हा पर्याय सुचविल्यामुळे या पर्यायाचे एकूण गुणांकन (54) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथेच्या स्वरुपात ऐतिहासिक माहिती समजून घेत असतांना विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढत होती.

11) सारणी क्र. **5.28** (शिक्षिकेने योग्य ते हावभाव, हालचाल केल्यामुळे आशय परिणामकारक वाटला.) च्या विधानासाठी एकूण विद्यार्थ्यांपैकी 22 विद्यार्थ्यांनी पूर्णपणे हा पर्याय स्विकारला असल्यामुळे या पर्यायाचे गुणांकन (66) हे इतर पर्यायांच्या एकूण गुणांकनापेक्षा जास्त आहे . त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीच्या अध्यापनात कथानिवेदिकेने योग्य त्या संदर्भात योग्य ते हावभाव, हालचाल केल्यामुळे आशय

परिणामकारक वाटला.

12) सारणी क्र. **5.29** च्या (कथाकथन पध्दतीने सांगितलेली माहिती जास्त काळ स्मरणात राहिली.) विधानासाठी एकूण विद्यार्थ्यांपैकी 20 विद्यार्थ्यांनी पूर्णपणे हा पर्याय सुचविलेला असल्याने या पर्यायाचे गुणांकन (60) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीने सांगितलेली माहिती विद्यार्थ्यांच्या जास्त काळ स्मरणात राहिली.

13) सारणी क्र. **5.30** च्या (कथाकथन पध्दतीने इतिहासातील थोर व्यक्तींचा इतिहास मनोरंजक वाटला.) विधानासाठी एकूण विद्यार्थ्यांपैकी 23 विद्यार्थ्यांनी पूर्णपणे हा पर्याय सुचविलेला आहे. यामुळे या पर्यायाचे एकूण गुणांकन (69) हे इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . या वरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीच्या सर्व तंत्रांचा वापर करुन अध्यापन केल्यामुळे विद्यार्थ्यांना इतिहासातील थोर व्यक्तींचा इतिहास मनोरंजक वाटला.

14) सारणी क्र. **5.31** च्या (कथाकथन पध्दतीने इतिहासातील थोर व्यक्तींची स्वभाववैशिष्ट्ये आत्मसात होण्यास मदत झाली.) विधानासाठी एकूण विद्यार्थ्यांपैकी 19 विद्यार्थ्यांनी पूर्णपणे हा पर्याय सुचविलेला आहे. त्यामुळे या पर्यायाचे एकूण गुणांकन इतर पर्यायांच्या गुणांकनापेक्षा जास्त आहे . यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कथाकथन पध्दतीने अध्यापन केल्यामुळे इतिहासातील थोर व्यक्तींचा जो इतिहास शिकविला गेला त्या थोर व्यक्तींची स्वभाववैशिष्ट्ये आत्मसात होण्यास विद्यार्थ्यांना मदत झाली.

15) सारणी क्र. **5.32** च्या (शिक्षिकेच्या कथनशैलीमुळे अध्यापन परिणामकारक वाटले.) विधानासाठी एकूण विद्यार्थ्यांपैकी 17 विद्यार्थ्यांनी पूर्णपणे हा पर्याय सुचविला असल्या कारणाने या पर्यायाचे गुणांकन (51) हे इतर पर्यायांच्या एकूण गुणांकनापेक्षा जास्त आहे . यावरुन असा निष्कर्ष निघतो की, एकंदरीत कथाकथनामध्ये वापरण्यात येणाऱ्या कथनशैलीमुळे अध्यापन परिणामकारक वाटले.

या सर्व निष्कर्षावरुन हे स्पष्ट होते की, कथाकथन तंत्रामधील सर्व घटकांवर योग्य तो भर देऊन काळजीपूर्वक अध्यापन केले तर ते अध्यापन परिणामकारक ठरते.

## 6.3 शिफारशी:

कथाकथन पध्दतीच्या अभ्यासावरुन वरीलप्रमाणे जे निष्कर्ष निघाले त्यावरुन खालील कांही गोष्टी सुचवाव्याशा वाटतात.

1) कनिष्ठ माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इतिहास विषयाची आवड निर्माण होण्यासाठी ऐतिहासिक घटनांचे योग्य प्रकारे आकलन होण्यासाठी आणि 1 ते 7 इयत्तांच्या पुनर्रचित अभ्यासक्रमात नमूद केलेली उद्‌दिष्टे योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी अशी शिफारस कराविशी वाटते की, कथाकथन पध्दतीच्या सर्व तंत्रांचा जाणीवपूर्वक अभ्यास करुन सरावाने ती कौशल्ये अंगी बाणवून त्याप्रमाणे अध्यापन केले जावे.

2) **कथेची भाषा:**

कथेची भाषा सोपी व बालकांची बोलीभाषा असावी. तसेच तिची लहान लहान वाक्ये तयार केलेली असावीत. तसेच ती ओघवती असावी.

3) **घटनांचा क्रम:**

कथेतील घटनांचा क्रम योग्य असावा. त्याचप्रमाणे त्यांना कालाची कल्पना स्थूलस्वरुपात द्यावी. त्याचा मोघमात उल्लेख करावा.

4) **कथेतील एकरुपता व तन्मयता:**

कथाकथन पध्दतीच्या अध्यापनात कथाकथकाने आपल्या कथानकाशी एकरुप व तन्मय व्हावे. तसेच त्यांनी आपल्या विद्यार्थी श्रोत्यांशी एकरुप, तन्मय व समरस व्हावे.

5) **कथाकथनातील आवाजातील चढउतार:**

कथाकथकाने आपले निवेदन मुलांना स्पष्ट, स्वच्छ, प्रभावीरित्या कळण्यासाठी व विविधरंगी होण्यासाठी वेगवेगळ्या स्वरांची वैशिष्ट्ये जाणून घ्यावीत. स्वरांचा वजनदारपणा, विस्तार, समग्र स्वर, विस्तारातील समतोल हे बारकावे कथानिवेकाने आत्मसात करावेत.

त्याचप्रमाणे आवाजाची तयारी हा एक स्वतंत्र विषय आहे म्हणून कथानिवेदकाने या विषयाची ओळख करुन घ्यावी व त्यातील आपल्या कथानिवेदकाला उपयुक्त असा भाग आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा.

6) **मुद्राभिनय व शारीरिक अभिनय:**

कथाकथकाने आपले कथाकथन प्रभावी होण्यासाठी शरिराच्या आणि ध्वनिच्या यथायोग्य अभिनयाची जोड कथेला द्यावी. मात्र अतिरिक्त अभिनय करुन कथेचे नाटक मात्र होऊ देऊ नये. कथाकथकाचा अभिनय बांधीव स्वरुपाचा असता उपयोगी नाही. तो सदासर्वदा मुक्त असावा.

त्याचप्रमाणे याबाबत आणखी एक बाब सुचवाविशी वाटते की, कथानिवेदक हा नट किंवा अभिनेता नसून तो कथाकथक असतो. त्याने पात्रानुरुप अभिनय जरुर करावा परंतु त्याच्यातला निवेदक सतत जागृत रहावा. म्हणजेच त्याने अधून मधून कथेत येत रहावे. कथेत येत कथा पुढे नेण्यासाठी नेतृत्व करावे कारण त्याला कथेचा, विद्यार्थी श्रोत्यांचा मार्गदर्शक, पालक, शिक्षक, वाटाड्या अशा महत्वपूर्ण भूमिका कराव्या लागतात.

7) **बहुश्रुतपणा:**

कथानिवेदकाने आपली कथा कथनीय करण्यासाठी त्यात भर टाकून ती फुलवावी, खुलवावी लागते यासाठी त्याने विविध तऱ्हेच्या माणसांचे, त्यांच्या उद्योगधंद्याचे, त्यांच्या चालण्याबोलण्याचे सूक्ष्म निरीक्षण करावे त्याचप्रमाणे वेळ, काळ, स्थळ, गाव यांचेही कांही संकेत असतात. कांही खुणेच्या गोष्टी असतात त्यांचा कथानिवेदकास परिचय असावा. कथाकथनात अशा कांही जागा असतात की, त्या कथानिवेदकाने नेमक्या हेरुन आपल्या बहुश्रुतपणाने भरुन कथा भरदार, डौलदार बनविण्याचा प्रयत्न करावा.

8) **चित्रमयता:**

कथाकथनाच्या चित्रमयता या तंत्राविषयी अशी शिफारस कराविशी वाटते की, चित्रमयतेमुळे कथेला पार्श्वभूमी मिळावी यासाठी कथेतील पात्रांचे चालणे, बोलणे तसेच कथेतील प्रसंगाची वेळ, काळ, स्थळ याचे हुबेहुब चित्र उभे करण्यासाठी शाब्दिक वर्णन करावे. हे

शाब्दिक वर्णन साध्या, सोप्या, सुटसुटीत वाक्यात असावे.

9) **कथेतील पात्रांची भाषा:**

कथेतील पात्रांची भाषा त्याची त्याची स्वभाववैशिष्ट्ये प्रकट करणारी असावी. कथेतील पात्रे एकमेकांशी जेंव्हा बोलत असतील तेंव्हा त्यांचे बोलणे आवश्यक तेथे संवाद रुपाने कथेत घालावे. यासाठी नाट्यीकरणाचा आधार घ्यावा. पात्राचे कथेतील काम, त्याचा हुद्दा त्याची स्वभाववैशिट्ये प्रकट करणारी असावी.

10) **वेळेची मर्यादा:**

कथाकथनाच्या वेळेविषयी अशी शिफारस करावीशी वाटते की, कथा किती वेळ सांगितली यापेक्षा कशी सांगितली याला महत्त्व आहे. यासाठी कथेला उगाच पाल्हाळ लावून वेळ भरण्याकरिता तिला राबवू नये, लांबवू नये तर आपले काम संपले की, कथेला संपू द्यावे. तरच ती प्रभावी ठरते.

## 6.4 सर्वसाधारण शिफारशी:

1) उत्कृष्ट कथाकथन कसे करावे याबाबत शिक्षकांना मार्गदर्शन मिळण्यासाठी शाळेत उत्कृष्ट कथाकथनाचे कार्यक्रम आयोजित करावेत.

2) शिक्षकांनी उत्कृष्ट कथाकथक लोकांचेकडून कथाकथनाच्या तंत्राचे बाबतीत अधिक ज्ञान मिळवावे.

3) कथाकथनाच्या अध्यापनासाठी परिश्रमपूर्वक तयारी करावी.

4) कथाकथन पध्दतीच्या तंत्राबद्दल, वापराबद्दल, उपयुक्ततेबद्दल माहिती देणारे कमीअधिक मुदतीचे कोर्सेस शासनाने आयोजित करावेत व त्यांचा लाभ सर्व इतिहास शिक्षकांना मिळावा अशी योजना असावी.

## 6.5 पुढील संशोधनासाठी कांही विषय:

या अभ्यास प्रकल्पातून मिळालेल्या अनुभवांती व मिळालेल्या निष्कर्षावरुन पुढील संशोधनासाठी खालीलप्रमाणे विषय सुचविता येतील.

1) कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत प्रायोगिक कार्य वेळेअभावी केवळ तीन महिने केले गेले आहे. हा प्रयोग संपूर्ण वर्षभर राबवून कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने संशोधन व्हावे.

2) केवळ द्वितीय सत्रातील संपूर्ण अभ्यासक्रम प्रायोगिक कार्यासाठी निवडला होता. याहीपेक्षा संपूर्ण वर्षातील अभ्यासक्रमाची निवड करुन त्यावर संशोधन व्हावे.

3) प्रस्तुत प्रायोगिक अभ्यासात वर्गातील केवळ 25 विद्यार्थ्यांचाच विचार केला होता. हाच प्रायोगिक अभ्यास संपूर्ण वर्गावर केला जाऊन संशोधन व्हावे.

4) इयत्ता 5 वी च्या कनिष्ठ स्तराप्रमाणेच इयत्ता 6 वी व इयत्ता 7 वी या कनिष्ठ स्तरावरील इतिहास अध्यापनातील कथारुप घटकाचे अध्ययन होण्याच्या दृष्टीने संशोधन व्हावे.

5) कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्यासाठी जसा योग्य तंत्राचा वापर होतो हे सिध्द होते त्याचप्रमाणे अधुनिक साधनाद्वारे कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होते की नाही यावर संशोधन व्हावे.

------